# DMK JAOLI BANK

## दत्तात्रय महाराज कळंबे जावली सहकारी बँक लि.,

**( नोंदणी क्र.:बी ओ एम/बी एन के/१२७ ऑफ १९७३ )**

**प्रशासकीय कार्यालय: ४१८/२०/२२, मौलाना आझाद मार्ग, मुंबई-४०० ००४.**

**दुरध्वनी क्र.: ०२२-२३८७०४३७ / २३८२२७७७ / २३८६२३५२**

**Website:www.jaolibank.in Email ID: hoadmin@jaolibank.in, hoscr@ jaolibank.in**

## ४९व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

(फक्त सभासदांकरीता)

बँकेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, बँकेची ४९वी वार्षिक सर्वसाधारण सभा, **रविवार दिनांक १८.०९.२०२२ रोजी सकाळी ठिक १०.३० वाजता" डॉ. अँटोनिओ डी-सिल्व्हा हायस्कुल, एस. के. बोले रोड, कबुतर खान्याजवळ, दादर (प), मुंबई-४०० ०२८"** येथे आयोजीत करण्यात आलेली आहे. सदर सभेस सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे, ही विनंती.

### * सभेपुढील विषय *

१. दिनांक २७ सप्टेंबर, २०२१ रोजी संपन्न झालेल्या ४८ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे,
२. दिनांक ३१मार्च, २०२२ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाचा अहवाल, वैधानिक लेखा परिक्षकांनी प्रमाणित केलेला ताळेबंद व नफा-तोटा पत्रकाचे वाचन करुन त्यास स्विकृती देणे,
३. वैधानिक लेखा-परिक्षकांचा सन २०२१-२२चा वैधानिक लेखा परिक्षण अहवाल व आर्थिक वर्ष २०२०-२१च्या वैधानिक लेखापरिक्षण दोष-दुरुस्ती अहवालाची (Compliance Report) नोंद घेणे,
४. संचालक मंडळाने शिफारस केल्याप्रमाणे सन २०२२-२०२३च्या अंदाजपत्रकास मान्यता देणे,
५. माहे ३१ मार्च, २०२२अखेर बँकेचे संचालक सदस्य व त्यांचे नातेवाईक यांना अदा करण्यात आलेल्या कर्जांची नोंद घेणे,
६. सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात सभासदांचे प्रशिक्षणाकरीता राबविलेले कार्यक्रम व आगामी कालावधितील धोरण यांचा आढावा घेणे,
७. महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे कलम ४९ अन्वये वैधानिक लेखापरिक्षकांनी प्रमाणीत केलेली संशयीत व बुडीत कर्जे येणे बाकी रक्कम संबंधीत कर्जदारांकडुन करावयाच्या वसुलीचे सर्व अधिकार अबाधीत ठेऊन निर्लेखन करण्यास मान्यता देणे,
८. ४९ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असलेल्या सभासदांची गैरहजेरी क्षमापीत करणे,
९. मा. अध्यक्षांचे परवानगीने येणाऱ्या इतर विषयांवर चर्चा करणे.

मुंबई
दिनांक:०२.०९.२०२२

संचालक मंडळाचे संमतीने
ईश्वरदास दयाराम लालवाणी
**मुख्य कार्यकारी अधिकारी**

**विशेष सुचना:**

१. गणसंख्येपुर्ती अभावी सभा तहकूब करावी लागल्यास सभा त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर म्हणजेच सकाळी ठीक ११.०० वाजता सुरु होईल व त्या सभेच्या कामकाजाच्या वेळी गणसंख्यापूर्तीची आवश्यकता राहणार नाही ,
२. वार्षीक सर्वसाधारण सभेचे कामकाज सुरळीत होण्यासाठी ज्या सभासदांना विधायक स्वरुपात काही प्रश्न, सुचना मांडावयाच्या असतील अथवा बँकेच्या कामकाजासंबंधी काही माहीती विचारावयाची असेल त्यांनी दि.०९.०९.२०२२ पर्यंत बँकेचे मुख्य कार्यालय, ४१८/२०/२२, मौलाना आझाद मार्ग, मुंबई-४०० ००४ या ठिकाणी कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत तपशीलवार लेखी स्वरुपात अथवा ***hoscr@jaolibank.in*** या ई-मेलवर आयडी वर पाठविल्यास त्याप्रमाणे वार्षिक सर्वसाधारण सभेत माहिती, खुलासा सादर करणे सोयीचे होईल,
३. भारतीय रिझर्व बँकेच्या सूचने नुसार सर्व सभासदांनी / खातेदारांनी के.वाय.सी.(K.Y.C.) बाबतच्या कागदपत्रांची पुर्तता करणे आवश्यक आहे. ज्या सभासदांच्या पत्त्यात बदल झाला आहे. किंवा वारसाची नोंद केलेली नाही त्यांनी या बाबींची त्वरीत पुर्तता करुन घ्यावी, त्याकरीता संबधिंत शाखेत संपर्क करावा.
४. बँकेचा सन २०२१-२२ चा ताळेबंद व नफा-तोटा पत्रक आणि वैधानिक लेखापरिक्षण अहवाल दि. ११.०८.२०२२ रोजीचे दैनिक पुढारी या वृत्तपत्रात प्रसिद्ध करण्यात आलेला आहे.